# <u>प्रेस नोट</u>

## <u>वसई विरार शहर महानगरपालिका स्तुत्य उपक्रम</u>

## <u>"परिवहन सेवा आपल्या दारी"</u>

वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेकडून 36 मार्गावर परिवहन सेवा देण्यात येत आहे. त्याचबरोबर महानगरपालिका हद्दीतील जेष्ठ नागरिक, दिव्यांग, कॅन्सरपिडीत व डायलेसिस रक्त शुध्दीकरण करुन घेणारे नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना (इंग्रजी माध्यम वगळून) मोफत बसपास सवलत देण्यात येत आहे. त्याचबरोबर महानगरपालिकेच्या बस सेवेची माहिती मिळण्याकरिता "**<u>आपली बस</u>**" या ॲपव्दारे बसच्या स्थितीबद्दल माहिती देण्यात येत आहे.

या योजना महानगरपालिका हद्दीतील प्रवाशांपर्यंत व नागरिकांपर्यंत पोहचविणे तसेच परिवहन सेवेसंदर्भातील सूचना व मागण्या नागरिकांकडून जाणून घेणेकरिता "**<u>परिवहन सेवा आपल्या दारी</u>**" हा कार्यक्रम मा. परिवहन समिती सभापती यांचे अध्यक्षतेखाली राबविण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचे नियोजन पुढीलप्रमाणे :-

- दिनांक 19 जानेवारी, 2024 रोजी दु. 3.00 ते सायं. 8.00 या वेळेत वसई विभागातील भुईगांव नाका, पाचुबंदर (आईस फॅक्टरीजवळ), सनसिटी, (पोलीस स्टेशनच्या बाजूला) व सातिवली नाका या ठिकाणी,

- दिनांक 20 जानेवारी, 2024 रोजी दु. 3.00 ते सायं. 8.00 या वेळेत नालासोपारा विभागातील आचोळे तलाव, तुळींज पोलीस ठाणे, प्रगती नगर नाका व नालासोपारा डेपो (प.) या ठिकाणी,

- दिनांक 21 जानेवारी, 2024 रोजी दु. 3.00 ते सायं. 8.00 या वेळेत विरार विभागातील मनवेलपाडा नाका, गांधी चौक, महानगरपालिका कार्यालया शेजारील बस स्टॉप, चंदनसार, (वासंतीबाई विष्णू ठाकूर स्मारक विद्यामंदिर शाळेच्या बाजूला) व बोळींज नाका या ठिकाणी राबविण्यात येणार आहे.

तरी शहरातील नागरिकांना व प्रवाशांना आवाहन करणेत येते की, महानगरपालिका परिवहन सेवेसंदर्भात काही सूचना व मागण्या द्यावयाच्या असल्यास उपरोक्त कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित रहावे. व परिवहन सेवेस सहकार्य करावे.

(कल्पक सुदाम पाटील)
सभापती, परिवहन समिती
वसई विरार शहर महानगरपालिका